**<u>प्रतिवादी क्र. १३ब ते १३फ तर्फे विधिज्ञ श्री.एस.जी.पणदुरकर यांचेमार्फत साक्षीदाराचा उर्वरीत जादा सरतपास शपथेवर सुरु–</u>**

(साक्षीदारास निशाणी १६५/३ लगत दाखल असणारे प्रमाणपत्र दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेले प्रमाणपत्र मीच हजर केलेले आहे. सदर प्रमाणपत्र हे कुळ कायदा कलम ८४ अ २ प्रमाणे मामलेदार सावंतवाडी यांनी माझे वडील रामा उर्फ रामचंद्र व चुलते गोपाळ यांना दि.२६/११/१९५७ रोजी दिलेले आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर प्रमाणपत्रास **निशाणी क्र.३१९** देण्यात आलेली आहे. त्यावेळी माझे वडील रामा व चुलते गोपाळ यांनी शासनाकडे चलनाने रक्कम रुपये १/– इतकी रक्कम जमा केलेली होती. मी ते मुळ चलन याकामी हजर केलेले आहे. (साक्षीदारास निशाणी १६५/४ लगत दाखल असणारे मुळ चलन दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेले चलन हे तेच आहे. त्यावर ट्रेझरी अधिकारी यांचा सही शिक्का आहे. सदर चलनास **निशाणी क्र.३२०** देण्यात आली.

सरतपास पूर्ण.

**<u>न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारीखेपर्यंत तहकूब</u>.**

सही/–

(श्रीमती दुर्गा प्र.पुजारी)

दि.१८/०१/२०२४. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),सावंतवाडी.